नि.दि.दा.क्र.८/२०२३
बँक ऑफ महाराष्ट्र वि. सोफियाबी व इतर
**निशाणी १२ खाली**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढील सरतपास विधिज्ञ श्री. एस.के. ढाकरे यांच्याकडुन सुरु.</u>**

१९. सध्या मी बँक ऑफ महाराष्ट्रामध्ये मॅनेजर म्हणुन कामाला आहे. आमचे बँकेचे झोन मॅनेजर यांनी मला सदर दावा चालविण्यासाठी लागणारे अधिकारपत्र दिलेले आहे. आता मला दि.११.०७.२०२४ रोजीचा अधिकारपत्र दाखविण्यात आला. त्यावर आमच्या बँकेचे झोन मॅनेजर यांची सही असुन ते माझे सहकारी असल्याने मी त्यांची सही ओळखतो. त्यावर आमच्या बँकेचा शिक्का असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.१६</u>** देण्यात येत आहे.

**<u>सरतपास पुर्ण</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एन.बी. सोनवणे यांच्याकडुन सुरु.</u>**

२०. मी बँक ऑफ महाराष्ट्र, वडोदबाजार शाखा येथे १०.०६.२०२४ रोजी मॅनेजर म्हणुन कामाला लागलो. मी येण्यापुर्वी त्या पदावर संतोष भांगे हे कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचे प्रकरण हे संतोष भांगे यांनी दि.२०.१२.२०२२ रोजी दाखल केले असुन त्यातील वकीलपत्रावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर प्रकरणात आलो त्यानंतर त्यातील कागदपत्रांची सर्व माहिती मी माझ्या वकीलांकडुन घेतली. सदर प्रकरणात संतोष भांगे यांची साक्ष आम्ही घेणार नाही. सदर प्रकरणात मी माझे वेगळे वकीलपत्र दिलेले नाही.

२१. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.१२.२०२२ रोजीची नोटिस पाठवितेवेळी आम्ही आमचे वकीलांना कोणतेही अधिकारपत्र (वकालतनामा) दिला नव्हता. सदर प्रकरणात आम्ही प्रतिवादींना पाठविलेली दि.०७.१२.२०२२ ची नोटिस प्रतिवादींना मिळाल्याबद्दल मी पोहच पावती दाखल केलेली नाही. साक्षीदार सांगत आहे की, सदर प्रकरणात आम्ही आर.पी.ए.डी. ने नोटिस पाठविली असल्याने त्याचा **नि.क्र.३४** वरील ट्रॅक रिपोर्ट दाखल केले आहे. पोस्टातुन आम्हाला पोहच पावती आली नाही त्यासंदर्भात आम्ही कोणते पत्र पोस्टाला दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३४ वरील ट्रॅक रिपोर्टवर "Not Delivered to addressee cannot be located" असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, **नि.क्र.३४** वरील ट्रॅक रिपोर्टवरुन प्रतिवादींना नोटिस मिळाल्याचा बोध होत नाही.

२२. प्रतिवादींचा प्रस्ताव मंजुर करण्यापुर्वी त्यावेळेसच्या मॅनेजरने स्वतः प्रतिवादींजवळ

असलेल्या मिळकतीबाबत चौकशी केली होती. परंतु चौकशी केल्याबाबतचा व्हीझिट रिपोर्ट सदर प्रकरणात दाखल नाही. सदरचे कर्ज हे टर्म लोन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी **नि.क्र.२७** वर त्यानंतर दाखल केलेल्या बॉडवरुन ते कशासाठी दिले याबद्दल कोणताही बोध होत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने कर्ज घेतल्यानंतर त्याचे काही हप्ते भरले होते. आता मला **नि.क्र.३५** वरील प्रतिवादीच्या खात्याचे दि.२८.०६.२०१८ ते १३.१२.२०२२ रोजीपर्यंतचे स्टेटमेंट दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, मात्र **नि.क्र.३५** वरील स्टेटमेंटवरुन आम्ही सदरचा दावा दाखल केला आहे. साक्षीदार सांगत आहे की, स्टेटमेंटसोबत क्लोझर दिले आहे, त्यावरुन सदरचा दावा दाखल केला आहे. दि.३०.११.२०२१ रोजी पर्यंत प्रतिवादीने रक्कम रुपये २५२९/– रुपये भरलेले आहे, असे त्या स्टेटमेंटमध्ये नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आणि रक्कम रुपये ४,२४,४८१/– इतकी रक्कम भरणे आहे, असे नमुद आहे. साक्षीदार सांगत आहे की, त्यात व्याज नमुद नसुन वादीने भरलेली रक्कम बाद केल्यानंतरची मुळ रक्कम नमुद आहे.

२३. दि.०७.१२.२०२२ रोजीच्या नोटिसपुर्वी देखील बँकेने प्रतिवादींना नोटिस दिली होती. ती नोटिस सदर प्रकरणात दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.०७.१२.२०२२ ची शेवटची नोटिस पाठविल्यानंतर आम्ही प्रतिवादीविरुध्द सदरचा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दाव्यात नमुद केलेली रक्कम आणि क्लोझर रिपोर्ट यांच्यात कोणताही ताळमेळ नाही.

२४. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० साली कोरोनाची महामारी आली होती. हे म्हणणे खरे नाही की, कोरोना महामारीच्यावेळेस प्रतिवादीने बँकेत येऊन त्याला कर्ज भरण्यासाठी सवलत मिळणेकामी विनंती केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.१२.२०२२ रोजीची नोटिस प्रतिवादींना मिळालीच नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी त्यांनी घेतलेल्या कर्जाचे नियमित भरणा करत असतांना देखील आम्ही घाईगडबडीने सदरचा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मला प्रस्तुतचा दावा चालविण्याचा कोणताही अधिकार प्राप्त नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दिले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला,**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

VRUSHALI GHADIGAONKAR

Digitally signed by VRUSHALI GHADIGAONKAR
Date: 2025.01.10 17:53:14 +0530

**(व्ही. व्ही. रावजाडेजा)**

**दि.०९.०१.२०२५** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फुलंब्री**